**उलटतपास उत्तरवादीतर्फे विधीज्ञ श्रीमती एम.व्ही.मोरे यांचेमार्फेत शपथेवर सुरु**

०७. हे म्हणणे खरे आहे की, मला माझे पती म्हणजेच उत्तरवादी क्र.०१ पासुन तीन मुले आहेत. त्यांची नावे रिध्दी, सोहम व स्वरा अशी आहेत. रिध्दीचे दिनांक १९/०५/२०२५ रोजी १९ वर्षे पुर्ण होतात. सोहमचे वय १२ वर्षे पुर्ण असुन स्वराचे वय ११ वर्षे पुर्ण आहे. सोहम व स्वरा मदर टेरेसा स्कुल मुंबई येथे शिक्षण घेत आहे. रिध्दीने बीएससी अॅग्रीकल्चर शिक्षण पुर्ण केले असुन ती दुस–या शाखेमध्ये ग्रॅज्युऐशन करत आहे. ती दापोली येथे शिक्षण घेत आहे.

०८. माझे लग्न मे महिन्यात झाले होते. सामान्यपणे नवीन लग्न झालेल्या मुली मे महिन्यामध्ये माहेरी येतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न होवुन मी सासरी आली त्यावेळी सासरी माझे पती, सासु–सासरे व एक विवाहीत नणंद तेथे राहत होती, माझी दुसरी नणंद मनिषा पवारचे माझे लग्नाचे पुर्वी लग्न झाले होते, नणंद मनिषा माझे लग्नाचेवेळी माझे सासरी नडवली येथे आली होती, माझे लग्नानंतर एक महिना नणंद मनिषा माझे सासरी राहिली होती, माझे लग्नानंतर एक महिना कालावधीपर्यत मी व सासरचे व्यक्तीमध्ये वादविवाद झाले नव्हते.

०९. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न झाले त्यावेळी उत्तरवादी क्र.०१ शेती व्यवसाय करायचा. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासरी मुख्याध्यापक होते, मुख्याध्यापक म्हणुनच ते सेवानिवृत्त झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्नानंतर एक वर्षामध्ये मी गरोदर राहिली, माझे गरोदरपणाचे वैदयकीय उपचार रोहा येथील डॉ. ध्रुव यांचे दवाखान्यामध्ये करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रथेप्रमाणे मला सातव्या महिन्यामध्ये माहेरी पाठविण्यात आले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तिचे सासरचे व्यक्तीने तिला ती ०५ महिन्यांची गर्भवती असतानाच माहेरी पाठविले होते.

प्रश्नः तुम्ही गरोदर असताना पाचव्या महिन्यानंतर प्रस्तुती होईपर्यत घेतलेल्या उपचाराचे अनुषंगाने दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले नाही.

उत्तरः माझी प्रस्तुती घरी झाली होती.

१०. हे म्हणणे खरे आहे की, मी सोहम व स्वरा यांना माझे सासरचे घरी जन्म दिला. हे म्हणणे खरे नाही की, त्या दोघांचे प्रस्तुतीवेळी झालेला खर्च माझे सासरचे व्यक्तींनी केला होता. सोहम व स्वरा यांचा जन्म डॉ. ध्रुव हॉस्पीटल येथे झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोघांचा जन्म तेथे झाल्याबाबत मी दस्तऐवज अभिलेखावर दाखल केला नाही, त्या दोघांचे जन्माचेवेळी मला किती खर्च आला त्याचा तपशिल मी माझे प्रतिज्ञापत्रामध्ये दिला नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, सोहमचा जन्म सन २०११ मध्ये व स्वराचे जन्म सन २०१३ मध्ये झाला होता, त्यांचे जन्माचे वेळी मी काय काम करीत होते याअनुषंगाने तपशिल माझे प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, त्यावेळी ती राईसमिल मध्ये कामाला जायची. मी इयत्ता आठवी पर्यत शिक्षण घेतले आहे. माझे पतीने इयत्ता दहावी पर्यत शिक्षण घेतले आहे.

१२. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे म्हणजेच उत्तरवादी क्र.०२ यांनी सन २००६ मध्ये माझे पतीला ऑटो रिक्षा घेवुन दिला होता. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तिच्या सास–यांनी तिच्या पतीला सन २००३ मध्ये ऑटोरिक्षा घेवुन दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी स्पष्टीकरणादरम्यान सांगितलेला सदरील मजकुर माझे प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की, मी बौध्द समाजाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचे समाजामध्ये लग्नाचे वेळी काय खर्च करायचा, याअनुषंगाने लेखी दस्त तयार केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, आमचे समाजामध्ये लग्नाचेवेळी काय

देणेघेणे करायचे, याअनुषंगाने तोंडी ठरवले जाते, माझे लग्नाचेवेळी ठरलेल्या तोंडी अटीशर्ती दोन्ही पक्षांनी पुर्ण केल्या होत्या, त्यामुळे दोन्ही पक्षांनी एकमेकांना दोष देण्याचा प्रश्न राहत नाही, त्यामुळे लग्नानंतर मी ही वस्तु आणली नाही, हा विषय राहत नाही.

१४.	हे म्हणणे खरे आहे की, सन २००८ मध्ये माझे सास–यांनी मला केलेल्या मारहाणीबाबत मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सन २००८ मध्ये मी सोने गहाण ठेवल्याचे अनुषंगाने पावती अभिलेखावर दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे पतीचे मित्र विकी व शरद गायकवाड यांना ओळखत नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की, ती केवळ शरद गायकवाड यांना ओळखते, ते तीचे सासरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शरद गायकवाडे हे माझे सासरे असल्याबाबत हे माझे प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, विकी व शरद गायकवाड यांचेशी माझे संबंधावरुन उत्तरवादी माझे चरित्र्यावर संशय घेत नव्हते.

१५.	हे म्हणणे खरे आहे की, आमचे समाजामध्ये वादविवाद निवारण करण्याकरीता ते बौध्दजन पंचायत समीतीकडे पाठविले जातात, दिनांक ०८/०५/२०१८ रोजी माझे पतीने सदर समितीकडे तक्रार दिल्यानंतर आमची बैठक झाली होती, त्यावेळी माझा मामाचा मुलगा उत्तम जाधव याचेवरुन माझे सासरचे व्यक्तींनी माझे चारित्र्यावर संशय घेतला होता, सदर समितीचे त्यावेळी यशवंत घेरु शिंदे अध्यक्ष होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १५/०४/२०१७ रोजी मी माझे मामाचे मुलीचे लग्नाकरीता मौजे डोंगरोली ता. माणगांव येथे गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी ४–५ दिवस तेथे राहिले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, ती त्यावेळी ०३ दिवस तेथे राहिली होती. हे म्हणणे खरे आहे

की, सदर लग्नानंतर ४–५ दिवसांनी माझा मामे भाऊ उत्तम जाधव माझे सासरी नडवली येथे आला होता. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तो तेथे माझे आईला बघायला आला होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ मध्ये मी, माझे पती व मुले माझे सासु सास–यापासुन वेगळे राहयचे. हे म्हणणे खरे आहे की, उत्तम जाधव याला माझे सासरचे व्यक्तीनी त्यापुर्वी बघीतले नव्हते, त्यावेळी माझे सासरचे व्यक्तींनी त्याचा पाहुणचार केला होता, त्यानंतर तो अधुन मधुन माझे सासरी यायला लागला, त्याला दोन मुले आहेत, त्याची पत्नी हयात नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे उत्तम जाधव याचे सोबत अधुन मधुन बोलणे व्हायचे. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तिचे उत्तम जाधव याचेसोबत मुलांचे कारणावरुन कधी कधी बोलणी व्हयायची. हे मला माहिती नाही की, उत्तम जाधवच्या मोठया मुलाचे नाव अमित आहे किंवा कसे. त्याचे लहान मुलाचे अमित आहे. हे म्हणणे खरे नाही की, अमित माझी मुलगी रिध्दीला फोन करायचा.

१६.        हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ मध्ये माझे पती ऑटो रिक्षा चालवायचे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८ मध्ये एकदा अचानकपणे माझे पती घरी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे पतीने मला व उत्तम जाधव याला माझे सासरचे घरातील बेडरुममध्ये बघीतले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे व उत्तम जाधव मधील शारीरीक संबंधाचे कारणावरुन मी व माझे पतीमध्ये वाद होत होते, आमचे सदर संबंधाची माहिती मुलगी रिध्दी हिने माझे पती व सास–यांना दिली होती, त्यामुळे मी तिला मारहाण केली होती,  मी व उत्तम जाधव मध्ये असलेल्या संबंधाचे कारणावरुन मी व माझे पतीमध्ये वाद होत होते, त्यावरुन मी माझे पतीला जेवणाचा डब्बा देत नव्हती.

१७.        हे म्हणणे खरे नाही की, मी व उत्तम जाधव मध्ये संबंधाचे कारणावरुन

माझे पतीने सभा बोलाविली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तिचे पतीने तिचे चारीत्र्यावर त्याला असलेल्या संशयापोटी सभा बोलाविली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर सभेमध्ये उत्तम जाधव याने माझे सासरी यायचे नाही असे ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१२ पासुन आम्ही माझे सासरचे नवीन घरामध्ये राहणे सुरू केले, माझे सासरचे जुन व नविन घर जवळ जवळ आहे, सदर दोन्ही घरे माझे सास–यांचे नावे आहेत, आमचे घराचे लाईटबिल माझे सासरे भरायचे.

१८. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरचे जुने व नविन घराचे व्यतिरिक्त त्यांचेकडे दुसरी मालमत्ता नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तिचे सास–याकडे त्यांचे वडीलांची वडीलोपार्जित जमीन आहे. सध्या मी माझे मुलांसोबत विरार, मुंबई येथे राहते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२०–२०२१ कोरोना कालावधीदरम्यान माझे पती मुलांकडे बघुन खर्चाकरीता आम्हाला पैसे दयायचे. मागील दोन वर्षापासुन मी विरार, मुंबई येथे राहते. मी तेथे किरायाने राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझा, माझे मुलांचा मुंबई येथे राहणे, शिक्षणाचा मोठा खर्च आहे, मी सदरील खर्च स्वतः नोकरी करुन करते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, ती धुणी–भांडीची कामे करुन पैसे मिळविते.

१९. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०८/०६/२०२३ रोजी माझे सास–यांचे निधन झाले. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे सास–यांचे वडीलोपार्जीत शेतजमीनीचे सातबारा उतारे अभिलेखावर दाखल केले आहेत, आज देखील सदर जमीनींचे वाटप झालेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासु–सासरे, पती माझे व मुलांचे आयुष्यामध्ये ढवळाढवळ करीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतचे प्रकरण दाखल केल्यानंतर मला सासरचे व्यक्तींकडुन त्रास देण्यात आला

नाही, मी त्यांचेविरुध्द खोटया तक्रारी पोलीस स्टेशनला दिल्या.

२०. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २४/१२/२०२४ मध्ये मी माझे सासरी आली होती, त्यादिवशी मी माझे पतीला त्रास दिला म्हुणन त्याने माझेविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, त्यादिवशी रात्री १२.०० वाजता ती तिचे सासरचे घरी आली होती, तिचे पतीने दुस–या स्त्रीला त्यांचे घरामध्ये आणली होती, मी माझे पती व सदर दुस–या स्त्रीला तेथुन हाकलुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याअनुषंगाने मी माझे पतीविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली नव्हती. मी सदर तक्रारीची प्रत अभिलेखावर दाखल केली नाही. ती मी पुढच्या तारखेला दाखल करेन.

२१. हे म्हणणे खरे आहे की, माझे सास–यांनी ते सेवानिवृत्त झाल्यानंतर नवीन घर बांधले, आमचे रेशनकार्ड माझे कडे आहे, त्याचा वापर मी माझे व मुलांचे कामाकरीता करते, सदर रेशनकार्ड मध्ये मी, माझे पती व मुलांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आजदेखील माझे पती ऑटोरिक्षा चालवितो, मागील दोन वर्षापासुन मी माझे पतीसोबत राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २००२ ते २०१८ या कालावधीमध्ये मी माझे सासरचे व्यर्क्तीविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दिल्या नव्हत्या, त्या मी अभिलेखावर दाखल केल्या नाहीत.

२२. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासरे आमचे समाजाचे अध्यक्ष होते.हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे मी सासरी राहत असताना माझे दोन मुलांना शाळेमध्ये, टयुशनला सोडायचे व घेवुन यायचे. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तिचे व तिचे पतीचे भांडण होण्यापुर्वी तिचे सासरे तिचे मुलांना शाळेमध्ये ने–आण करायचे. हे म्हणणे खरे आहे की, माझे मुले ज्या शाळेमध्ये शिक्षण घ्यायचे त्या शाळेचे कमिटीचे माझे सासरे अध्यक्ष होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझे

सासरे मुलांच्या शाळेच्या फी वेळेत भरायचे. हे म्हणणे खरे नाही की, मी करीत असलेल्या नोकरीचे अनुषंगाने तपशिल प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद नाही. माझे कथनाप्रमाणे सुरूवातीपासुन आतापर्यत मी स्वतः कामधंदा करते.

२३. हे म्हणणे खरे नाही की, मी अभिलेखावर खोटे शपथपत्र दाखल केले व आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

**(प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष बंद न्यायालयात नोंदविण्यात आली.)**

उलटतपासणी पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

---स्वाक्षरी---

स्थळ : रोहा.　　　　　　　　　　　(एस. एस. महाले)
दि. १०.०३.२०२५　　　　　　　दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), रोहा.